# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

'ज्ञानेश्वर कोळी' यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास 'जगणे माझे' (१९९१), 'आयुष्याच्या वाटेवर' (१९९६), 'आकाश पेलताना' (१९९९) आणि 'घन दाटलेले' (२००२) या कवितासंग्रहांच्या आधारे करणे हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा उद्देश आहे.

**'१९८० नंतरची मराठी कविता : स्वरूप व प्रेरणा'** या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये आधुनिक मराठी कवितेची वळणे, महत्त्वाचे टप्पे व १९८० नंतरच्या मराठी कवितेचे स्वरूप तसेच महत्त्वपूर्ण कवींचे काव्यलेखनातील योगदान याचा आढावा घेतलेला आहे.

१८८५ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांतीकाल होय. या क्रांतीचे आद्य प्रवर्तक केशवसुत यांनी मराठी कवितेचे अंतरंग व बाह्यांग बदलून टाकले. केशवसुतांनी आपल्या काव्यलेखनामध्ये विविध अभिनव प्रयोग केले. केशवसुतांनी काव्याच्या रचनेचे, आशय-विषयांचे बंधन झुगारले व काव्यात विविधता आणली.

बालकवींनी निसर्गकाव्याला वेगळे परिमाण प्राप्त करून दिले. कल्पनासृष्टीची निर्मिती व स्वच्छंदीवृत्तीचे काव्य हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य ठरले. 'प्रेमाचे शाहीर' या नावाने परिचित असणारे गोविंदाग्रज यांनी प्रणयभावना, प्रेमातील उत्कटता, उदात्तता व वैयक्तिक सुखदु:खात्मक भावभावनांना काव्यात स्थान प्राप्त करून दिले. भा.रा. तांब्यांनी काव्यातून सौंदर्याविष्कार घडविला. रविकिरण मंडळातील कवींनी कवितेला व्यासपीठावर आणले. माधव जूलियन व यशवंत यांनी काव्यक्षेत्रात महत्त्वाची भर घातली. रविकिरणमंडळ नंतर अनिल, कुसुमाग्रज व बा.भ. बोरकर यांनी मराठी काव्यप्रवाह समृद्ध करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

संजीवनी मराठे, पद्मा गोळे, शांता शेळके यांनीही या काळात काव्यलेखन केले. बा.सी. मर्ढेकरांनी कवितेत अमुलाग्र बदल केला. मुक्तिबोधांनी मुक्तछंदात्मक कवितेवर भर दिला. पु.शि. रेगे व गोविंद विनायक करंदीकर यांनी काव्यात नवनवे प्रयोग केले. मंगेश पाडगावकर, वसंत बापट, इंदिरा संत, दिलीप चित्रे, अरूण कोलटकर या महत्त्वपूर्ण कवींनी मराठी कवितेच्या प्रवाहात मोलाची भर टाकली.

नारायण सुर्व्यांच्या कवितेतून संघर्षाची जाणीव प्रथम प्रकट झाली. नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, वामन निंबाळकर या कवींनी विद्रोही कविता पुढे आणली. श्री. ना.धो. महानोरांनी कवितेतून रान साकार केले. १९८० नंतरच्या कवींनी मराठी कवितेचे दालन समृद्ध केले. ग्रामीण कविता, विद्रोही कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता अशा सर्व प्रवाहात विपुल साहित्यनिर्मिती होऊ लागली. नारायण कुलकर्णी–कवठेकर, उत्तम कोळगावकर, अशोक बागवे, वसंत पाटणकर, गुरूनाथ सामंत, विवेक मोहन राजापुरे, अनुराधा पाटील, रजनी परूळेकर अशा नव्या पिढीतील कवींनी–कवयित्रींनी काव्यातून विविध जाणिवा प्रकट केल्या.

विठ्ठल वाघ, नारायण सुमंत, इंद्रजित भालेराव, मोहन पाटील, शहाजिंदे, ज्ञानेश्वर कोळी यांनी ग्रामीण जीवन–जाणिवा मांडल्या व ग्रामीण भागातील लोकांची दु:खे समाजासमोर आणली.

विद्रोही कविता लिहून लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम सारख्या कवीनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडली.

ही नवकविता संमिश्र स्वरूपाची असून आशय व विषयाच्या बाबतीत वेगळेपण सिद्ध करणारी आहे. १९८० नंतरचे कवी आपली ठोस भूमिका मांडतात व नवनव्या संकल्पना उभ्या करतात. आत्मभान, जागृतता, सामाजिक जाणिवा,

परिवर्तनाची आस, क्रांतीकारी भाषा व जीवनानुभव मांडणारी १९८० नंतरची कविता स्वत:चे स्थान निर्माण करते.

**'ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेतील आशयविश्व'** या दुसऱ्या प्रकरणात ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे आशयविश्व स्पष्ट केलेले आहे. कोळींच्या कवितेतून अनेक सामाजिक जाणिवा प्रकट झाल्या आहेत. मानवतेची विटंबना, गरिबांच्या पाचवीला पुजलेले दारिद्रय, भिकाऱ्यांचे भीषण दारिद्रय, स्वार्थी पुढाऱ्यांचे चित्रण, समाजातील विषमता, स्त्री-जीवन, सामाजिक रूढी-पद्धती अशा अनेक सामाजिक घटकावर कोळींनी चिंतनशील काव्यनिर्मिती केली आहे.

कोळींची कविता जीवनविषयक जाणिवाही प्रकट करते. मानवी जीवनातील दु:ख, जीवनाची क्षणभंगूरता आयुष्याला आलेले यांत्रिकपण, जीवनात करावा लागणारा संघर्ष त्यांच्या कवितेतून व्यक्त होतो. कोळींची कविता आत्मशोधाबरोबरच जीवन शोध घेते. ही कविता वेदनेतून जन्मलेली आहे व आयुष्याला व्यापून राहिलेली भूक या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. कोळींच्या कवितेतून व्यक्त होणारा निसर्ग अनेक रूपे प्रकट करतो. त्यांनी प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कविताही लिहिल्या आहेत. त्यांच्या कवितेत विविधता आहे. व्यापकता आहे. आपल्या भावना कवीने यशस्वीपणे वाचकापर्यंत पोहचवल्या आहेत व कवितांची शीर्षकेही सूचक आहेत.

'ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेची अभिव्यक्ती' या तिसऱ्या प्रकरणात कोळींच्या कवितेचे अभिव्यक्ती विशेष मांडलेले आहेत. कोळींनी आपल्या भावभावना मांडण्यासाठी ग्रामीण भाषेचा वापर केलेला आहे. कोळींच्या कवितेतील प्रतिमासृष्टी समृद्ध आहे. निसर्गप्रतिमा, पशू-पक्षी प्रतिमा, स्त्री प्रतिमा, विपुल प्रमाणात त्यांच्या कवितेत अवतरतात. मुक्तछंद व अलंकाराचा सूचक वापर कोळींनी आपल्या कवितेत केलेला आहे.

कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेला समाज मागासलेला, उपेक्षित व सर्व स्तरातील आहे. मानवी जीवनाच्या विविध स्तरांचे व घटकांचे चित्रण त्यांच्या कवितेत आढळते. समाजातील वास्तव मांडणारे कोळी सामाजिक अभ्युदयाचा विचार मांडताना दिसतात. ते परिवर्तनाची/क्रांतीची भाषा बोलतात व प्राप्त परिस्थितीवर मात करण्याची उमेद बाळगतात. त्यांच्या कवितेत अभिव्यक्तीच्या दृष्टीने विविधता आहे. अनेक रचनाप्रकार ते सहजपणे हाताळतात. शब्दकळा वास्तवपूर्ण असल्याने कृत्रिमपणा कुठेही आढळत नाही तर कविता अधिक सजीव, जिवंत वाटते.

**'ज्ञानेश्वर कोळी यांच्या काव्यलेखनाचे विशेष व मर्यादा'** या चौथ्या प्रकरणामध्ये ज्ञानेश्वर कोळींच्या काव्यलेखनाचे विशेष नमूद केले आहेत. कोळी हे सामाजिकतेचे भान ठेवून लिहिणारे कवी आहेत. ज्या समाजात त्यांची जडण-घडण झाली त्या समाजाचे सुख-दु:ख त्यांनी चित्रित केले आहे. त्यांची कविता मानवी जीवनाचे सखोल चिंतन करते. मानवी जीवनाचे विविध स्तर, मानवाची जीवनशैली, मानवी जीवनाची नश्वरता, परिवर्तन या गोष्टींचे चिंतन त्यांच्या कवितेत आले आहे. कोळींच्या कवितेची भाषा क्रांतीची आहे. वास्तव बदलण्यासाठी कवी बंडाची भाषा बोलतात. अर्थपूर्ण शब्दयोजना, अन्वर्थक प्रतिमा, म्हणी-वाक्प्रचारांचा सूचक वापर यामुळे त्यांची कविता प्रभावी ठरली आहे. कोळींच्या काव्यसंग्रहाची व कवितांची शीर्षके अन्वर्थक आहेत व कवितेची भाषा सहज, सोपी, अर्थप्रवाही आहे. दुर्बोधता, क्लिष्टता याची बाधा त्यांच्या कवितेला झालेली नाही. त्यांची कविता समाजातील वास्तव प्रकट करते व बदलाची नोंद घेते. तसेच सामाजिक रूढी संकेतांचे सुक्ष्म निरीक्षण त्यांच्या कवितेत आलेले आहे. आजूबाजूचा निसर्ग अगदी सुचकतेने त्यांच्या कवितेत आला आहे. निसर्गातील सुक्ष्म बारकावे कवीने टिपलेले आहेत. आत्मशोध हे या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. परंतु केवळ आत्मशोध न घेता ही कविता जीवनशोध घेताना दिसते.

'उपसंहार' या पाचव्या प्रकरणामध्ये पहिल्या प्रकरणापासून चौथ्या प्रकरणापर्यंतच्या घटकांचा आढावा घेतला आहे. कवीची आत्मनिष्ठा, समाजाभिमुखता, जीवनाभिमुखता, प्रेमनिष्ठा कर्तव्यनिष्ठा, जीवनानुभवाची व्याप्ती, आवाका, प्रत समाजावून घेऊन त्यांच्या काव्यसंग्रहातील कवितांची आशयसूत्रे व अभिव्यक्ती विशेष याचा यथार्थपणे अभ्यास करून त्यातून जे ठळकपणे जाणवले व जे निष्कर्ष हाती लागले ते खालीलप्रमाणे –

**निष्कर्ष :**

१) ज्ञानेश्वर कोळी सामाजिकतेचे भान ठेऊन लिहिणारे कवी आहेत व त्यांच्या कवितेतून अनेक महत्त्वपूर्ण सामाजिक जाणिवा अभिव्यक्त झालेल्या आहेत.

२) आशय–विषयाच्या कक्षा रूंदावणारी आणि खचलेल्या मनाला बळ देणारी व त्या मनाला सक्षम बनविणारी कोळींची कविता जीवन–जाणिवांचा वास्तववेध घेणारी वास्तववादी कविता आहे.

३) कोळींची कविता अनुभवातून स्फुरलेली असल्याने ती अधिक सजीव बनलेली आहे. तिच्यामध्ये कृत्रिमता आढळत नाही.

४) कोळींची निसर्गकविता निसर्गाची दोन्ही रूपे प्रकट करते. आषाढ–श्रावणातील अल्हाददायक निसर्गाबरोबरच मानवी जीवनाला छळणारा निसर्गही त्यांनी रेखाटलेला आहे. त्यांनी शब्दबद्ध केलेला निसर्ग केवळ सौंदर्यनिष्ठ नसून सर्वसामान्यांच्या दु:खाच्या वास्तवतेची किनार त्याला बेमालूमपणे जोडली गेलेली आहे.

५) कोळींची प्रेमकविता श्रृंगारापेक्षा मानवी भावभावनांना महत्त्व देणारी असून या प्रेमकवितांची संख्या मर्यादित आढळते व सामाजिक कवितांच्या तुलनेत ती कमी सरस वाटते. मात्र पती–पत्नीच्या नात्यातील प्रेमभाव व्यक्त करणारी कविता कलात्मकतेच्या कसाला उतरली आहे.

६) कोळींच्या कवितेला लय व ताल स्वाभाविकपणे प्राप्त झाल्यामुळे गेयतेचे देणे या कवितेला लाभलेले जाणवते.

७) कोळींच्या कवितेची शीर्षके अर्थपूर्ण व सूचक आहेत व काव्याशयाला ती अनुरूप वाटतात.

८) कोळींच्या कवितेत आजूबाजूचा परिसर तेथील माती, निसर्ग, साधीभोळी सामान्य माणसे, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण लोकांची सुखदु:खे यांचे प्रतिबिंब पहावयास मिळते.

९) कोळींनी आपल्या कवितेत विविध प्रतिमा, प्रतिके, अलंकार, छंद यांचा योग्य वापर करून कवितेत कलात्मकता साधलेली दिसते.

१०) कोळींच्या कवितेची भाषा साधी-सोपी व सहजपणे समजणारी असल्याने त्यांची कविता वाचकाच्या मनाला भिडते. तिच्यात दुर्बोधता आढळत नाही.

११) कोळींची कविता आत्मशोध घेणारी आणि आत्मशोधाबरोबरच जीवनशोध घेणारी सतर्क, संवेदनशील व चिंतनशील कविता आहे.

१२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची भाषा परिवर्तनाची व क्रांतीची भाषा आहे. समाजातील भीषण वास्तव बदलण्यासाठी आपल्या शब्दातून ते वाचकामध्ये चैतन्याचे स्फुल्लिंग फुलवण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

१३) आधुनिकीकरण, शहरीकरण, मानवी जीवनाला आलेले यांत्रिकपण अशा सामाजिक बदलांची नोंद कोळींची कविता घेते व या बदलातही माणुसकी टिकून रहावी म्हणून चिंतन करताना दिसते.

१४) कोळींच्या सर्वच कवितेतून एक वेदनेची जाणीव झिरपताना दिसते. ही वेदना वाचकाला अस्वस्थ करते. मात्र वेदना व्यक्त करणारी ही कविता कुठेही